# प्रकरण पहिले

# दलित कवितेतील सामाजिक जाणिवा प्रकट करणारी कविता

## प्रकरण पहिले

# दलित कवितेतील सामाजिक जाणिवा प्रकट करणारी कविता

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, मुस्लिम साहित्य, आदिवासी साहित्य, कामगार साहित्य इ. प्रकार नव्याने उदयास आले. त्यापैकी दलित साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सर्वच प्रवाहात कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन, कविता आणि वैचारिक लेखन विपूल प्रमाणात निर्माण झालेले आहे. आंबेडकरपूर्व काळामध्ये गोपाळबाबा वलंगकर, किसन फागोजी बनसोडे, शिवराम जानबा कांबळे इ. नी काव्य आणि वैचारिक लेखनाला प्रारंभ केला. दलित शाहिरांनी शाहिरीच्या माध्यमातून रंजनाबरोबर प्रबोधनही केले आहे. तथापि आंबेडकरी कालखंडामध्ये दलित अभिव्यक्तीला तत्त्वज्ञानाची बैठक मिळाली आणि दलित साहित्य हा एक आगळा-वेगळा प्रवाह मराठी साहित्यात येऊन दाखल झाला. डॉ. आंबेडकरांच्या विचारामुळे भारावून गेलेला दलित माणूस आपल्या वाट्याला आलेले अनुभव कविता, कथा, कादंबरी, आत्मकथन, नाटक यांच्या माध्यमातून अधिक परिणामकारकतेने मांडू लागला. त्यामुळे दलित कविता विपूल प्रमाणात आणि गुणात्मकरित्या उच्च दर्जाची झाली आहे. दलित कवितेच्या प्रांतात आजपर्यंत ढोबळमानाने तीन पिढ्यांनी काव्यलेखन केलेले दिसून येते.

## १.१ दलित साहित्याची संकल्पना:

दलितांनी लिहिलेले ते 'दलित साहित्य' या संकल्पनेनंतर आणखी काही संकल्पना पुढील काळात मांडल्या गेल्या आहेत. 'दलित समाजाचे आणि त्यांच्या जीवनाचे अभिदर्शन ज्यामध्ये आहे ते दलित साहित्य' असे म्हणण्याचे कारण साहित्य हा जीवनाचा आरसा असतो. यादृष्टीने दलित साहित्याची परिभाषा, संकल्पना ठरवावी लागते. दलित साहित्य

लिहिणाऱ्या आणि त्याची समीक्षा करणाऱ्या मान्यवरांनी दलित साहित्याची संकल्पना विविध प्रकारे स्पष्ट केली आहे.

**१) म.ना. वानखेडे :**

दलित लेखकांनी दलिताविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.''[१]

**२) बाबुराव बागूल :**

''माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे माणसाला महान मानणारे वंश, वर्ण आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य होय.''[२]

**३) त्र्य.वि. सरदेशमुख :**

''दलित जीवनाचे दर्शन देणारे, दलितांच्या विचार भावना प्रकटविणारे दलितांनीच लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.''[३]

**४) केशव मेश्राम :**

''हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.''[४]

**५) शरदचंद्र मुक्तिबोध :**

''दलित असणे आणि दलित जाणीव असणे यात फरक आहे. जीवन विषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय होय.''[५]

**६) प्र. श्री. नेरुरकर :**

''प्रत्यक्ष जीवन अनुभव घेणाऱ्या दलित वर्गातील साहित्यिकांनी केलेला प्रक्षोभ व विद्रोह आविष्कार म्हणजे दलित साहित्य.''[६]

७) **म.भि. चिटणीस :**

''दलित वर्ग हा एक भारताचा पुराण मूक आणि अदृश्य पुरुष होता आणि त्याचा अनुभव आज वाङ्मयीन रुप घेत आहे. हा सगळा संदर्भ दलित शब्दाला द्यावा लागेल.''[७]

८) **गं.बा. ग्रामोपाध्ये :**

''चीड, संताप, बंडखोरी, प्रवृत्तीची काही लक्षणे या वृत्तीचा कलात्मक आविष्कार म्हणजे दलित साहित्य.''[८]

९) **गंगाधर पानतावणे :**

''दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्तीसंग्राम आहे. स्वत:ला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. अशी त्रिज्या रेखाटली जाते त्यास दलित साहित्य म्हणावे.''[९]

१०) **राजा ढाले :**

''जो जो या समाजरचनेविरूद्ध आणि सांस्कृतिक व्यवहाररचनेविरूद्ध लढण्याचा दृष्टिकोण घेऊन साहित्याची निर्मिती करेल आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणेल तो दलित साहित्यिक असेल आणि त्याचे म्हणजे दलित साहित्य होय.''[१०]

या सर्व व्याख्या एकत्रित अभ्यासल्यावर हे स्पष्ट होते की, दलित माणसाने आजवर जो अन्याय सहन केला त्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य दलित साहित्य करीत आहे. समाजा विरोधीचा संताप, चीड हा साहित्यिक व्यक्त करतो. प्रारंभ काळातील कविता प्रामुख्याने याच प्रकारची आढळते. म्हणूनच दलित साहित्य विद्रोही साहित्य म्हणून ओळखले गेले आहे.

दलित साहित्य ज्या प्रेरणा व प्रयोजनातून निर्माण झालेले आहे त्याचा उल्लेख या व्याख्यातून आला आहे. या सर्व व्याख्येतून असे सुद्धा जाणवते की, दलित माणसाचे आज

पर्यंत झालेले अवमूल्यन ते घडविणाऱ्या परंपरा, समाजरचना या विरूद्ध विद्रोह पुकारून दलित लेखकांनी मोठे कार्य केले आहे. माणसाच्या प्रतिष्ठेचे व माणुसकीचे मूल्य प्रस्थापित करण्यासाठी लढ्याची प्रेरणा देणारे हे साहित्य आहे. दलितांची अस्मिता जागविणारा, त्यांची स्वप्ने पल्लवित करणारा प्रगतीशील विचार, भावना, संवेदनांचा उदात्त हुंकार म्हणजे दलित साहित्य होय.

अशाप्रकारे दलित साहित्य एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे आव्हान स्वीकारून निर्माण झालेले साहित्य आहे. त्यात वेदना आणि विद्रोह अत्यंत उत्कट स्वरुपात व्यक्त झाला आहे. ज्याचं जळत त्यालाच कळत अशाच भावनेतून संवेदनशील मनाने टिपलेली सामाजिक जाणीव या दलित कवितेतून प्रकट झालेली आहे. आंबेडकरांच्या विचारांचा मोठाच प्रभाव या लेखकांच्या मनावर उमटला असल्याचे जाणवते. दलित साहित्य दलितपणाचे दु:ख व्यक्त करतेच शिवाय त्या विरुद्ध आवाज उठविण्याचे सामर्थ्यही वाचकाला देते. हेच दलित साहित्याचे वेगळेपण आणि बळही आहे.

## १.२ दलित कवितेची पार्श्वभूमी :

वाङ्मयाचे 'मौखिक' आणि 'मुद्रित' असे दोन प्रकार करता येतात. 'मौखिक' म्हणजे मुखातून आलेले, बोललेले, सांगितलेले, सांगावयाचे असलेले असे वाङ्मय. 'मुद्रित' म्हणजे छापलेले वाङ्मय होय. संत काळात मौखिक रचना गेय स्वरुपाची आणि निवेदन स्वरुपाची होती. संत कवितेत भावकाव्यात्मक कविता, भाष्यकाव्यात्मक कविता आणि कथनकाव्यात्मक कविता असे तीन प्रकार दिसतात. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम हे चार संत वारकरी संप्रदायाची परंपरा असलेले आहेत. वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' शिवाय अमृतानुभव हाही एक तत्त्वज्ञानपर ग्रंथ लिहिलेला आहे. 'चांगदेव पासष्टी' आणि बरेच स्फुट अभंग अशी त्यांची इतर काव्यरचना आहे. वेद न जाणणाऱ्या, संस्कृत भाषेचे ज्ञान नसलेल्या सर्वसामान्य जनतेसाठी ज्ञानेश्वरांनी मराठीतून

गीतेवर केलेले भाष्य ज्ञानेश्वरीच्या रुपाने अजरामर होऊन राहिले आहे. ''माझा मऱ्हाटाचि बोलू कौतुके । परि अमृतातेही पैजा जिंके'' या शब्दातून ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेविषयीचा आपला अभिमान आणि प्रेम व्यक्त केलेले आहे. नामदेव हे ज्ञानेश्वरांचे समकालीन संतकवी नामदेवांनी सगळ्या जातीजमातीतील लोकांना एकत्र करून वारकरी संप्रदायाचा विस्तार केला.

मराठी संत वैदिक परंपरा मानणारे होते. हे अगदी उघड आहे. त्यांचा पिंड समन्वयशील धर्मसुधारकांचा होता. सामाजिक जीवनप्रवाहाचे सातत्य भंग पावू नये यावर यांचा विशेष कटाक्ष होता. जुन्या परंपरेतील साचेबंदपणा व जडत्व काढून टाकण्याचा तिला सचेतन, प्रवाहशील बनविण्याचा ते प्रयत्नही करीत या अर्थाने संत कवी परिवर्तनवादी होते. मात्र रामदास हे पुनरुज्जीवनवादी होते. संतांनी वर्णाभिमानाचा निषेध करून सामाजिक समता आध्यात्मिक पातळीवर स्थापण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच शूद्र जातीतील चोखामेळा, गोराकुंभार, जनाबाई, विठाबाई यांची कविता संतकवितेत समाविष्ट होते.

## १.३ दलित कवितेची प्रेरणा :

दलित साहित्याची प्रेरणा पाहत असताना अनेक मतमतांतरे असलेली दिसतात. काहीजण दलित साहित्याचा उगम बुद्धकाळात शोधताना दिसतात. काहीजण चोखामेळा पर्यंत जातात, काहीजण म. फुल्यांपर्यंत तर काहीजण किसन फागोजी बनसोडे, नावाचा दलित कवी हाच दलित साहित्याचा जनक मानतात. ही सर्व मतमतांतरे लक्षात घेता असे दिसते की, ज्यांनी दलितांविषयी पिळल्या जाणाऱ्याविषयी अन्यायाविरूद्ध आपल्या लेखणीद्वारे वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. ते सर्वजण दलित साहित्याची प्रेरणा स्त्रोत ठरतात.

काही विचारवंत व अभ्यासक वस्तुनिष्ठदृष्ट्या असा विचार मांडतात. की दलित साहित्याचे उमगस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, त्यांची जीवनदृष्टी तसेच या

अनुषंगाने त्यांनी केलेल्या चळवळी या सर्वांमध्ये आपणास सापडते. 'बहिष्कृत भारत'च्या पहिल्या अंकात बाबासाहेब लिहितात, ''सत्ता व ज्ञान नसल्यामुळे ब्राह्मणोत्तर व मागासलेले यांची उन्नती खुंटली हे निर्विवाद आहे. परंतु त्यांच्या दु:खात दारिद्र्याची तरी भर पडली नाही. कारण शेती व्यापार उदीम अथवा नोकरी करून आपला चरितार्थ चालविणे त्यांना दुरापास्त नाही पण या सामाजिक विषमतेचा बहि:ष्कृत समाजावर झालेला परिणाम अतिघोर आहे. दौर्बल्य, दारिद्र्य व अज्ञान या त्रिवेणी संगमात हा अफाट बहि:ष्कृत समाज वाहवला आहे. हे खास दिर्घकाळ अंगी मुरलेल्या दास्यामुळे उद्‌भवलेली हीनता त्यांना मागे खेचीत आहे. आहे ती स्थिती योग्य आहे, यापेक्षा बरी स्थिती आपल्या नशिबी नाही. अशा समजुतीचा विघातकपणा ह्या पतितांच्या नजरेस आणण्यास ज्ञानासारखे साधन नाही. तेच आज विकत घ्यावे लागत आहे आणि दारिद्र्यामुळे ते दुर्मिळ झाले आहे. कोठे-कोठे तर घेऊ गेलो असता ते मिळत नाही. कारण ज्ञानमंदिरात सर्वच ठिकाणी अस्पृश्यांचा प्रवेश होतो असे नाही. दारिद्र्याची बोळवण करण्यास कपाळी अस्पृश्यतेचा शिक्का मारला असल्यामुळे पैसे मिळविण्यास हवी तेवढी संधी किंवा मोकळीक नाही. नोकरी, व्यापारउदीम इत्यादी धंद्यात त्यांचा क्वचितच रिघाव असतो. नशीब काढण्यास कोठेच जागा नसल्यामुळे त्यांना केवळ भुईचे खडे खात पडावे लागत आहे.''[११]

दलित समाज आज हालअपेष्टांच्या आणि त्यागाच्या अग्निदिव्यातून चालला आहे. पण त्यातून गेल्याशिवाय त्याला मोठेपणा प्राप्त होणार नाही असे बाबासाहेबांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बंडखोर लेखणीने आणि क्रांतिकारी वाणीने दलित समाजात जनजागृतीचे मौलिक कार्य केले. त्याचबरोबर सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्राबाबत दलितांमध्ये जागृती होणे त्यांना आवश्यक वाटले. दलित माणसेसुद्धा इतर माणसांप्रमाणेच आहेत. अशी आत्मविश्वासाची भावना त्यांनी दलित समाजामध्ये निर्माण केली.

शेकडो वर्षे पशुपातळीवर जीवन जगणाऱ्या दलित समाजाला, त्यांनी मनुष्यत्त्वाची जाणीव करून दिली. माणूस म्हणून जगण्यास प्रवृत्त केले. आजपर्यंत दलित व दलितेतर समाजातील समाजसुधारकांना जे कार्य करता आले नाही ते बाबासाहेबांनी केले. म्हणूनच दलित लोकजीवनाची व दलित साहित्याची प्रेरणा त्यांच्याच साहित्यामध्ये व विचारामध्ये आहे असे म्हणावे लागते.

## १.४ दलित कवितेचे स्वरुप :

दलित साहित्याची सुरवातच मुळी कवितेतून झाली आहे. सुरवातीची दलित कविता वेदना, विद्रोह, नकार प्रकट करणारी आहे असे सर्वच समीक्षक म्हणतात.

दलित कविता ही ते जीवन प्रत्यक्षात जगणाऱ्याची कविता आहे. दलितांना त्यांच्या जीवनामध्ये प्रत्यक्ष आलेले भीषण अनुभव, भयंकर दुःख, भोगावे लागलेले भोग त्यांनी कवितेतून मांडले आहेत. म्हणूनच ती त्यांच्या जगण्यातून निर्माण झालेली आहे असे म्हणता येते. दलित कविता दलितांच्या जीवनाचे चित्रण करतेच शिवाय या जळत्या जीवनामागे असलेली कारणे शोधते. त्यांचा अंतर्वेध घेऊ इच्छिते आणि व्यापक जीवनावर ती भाष्य करते. समाजरचना ही मानवनिर्मित आहे व ती बदलण्याची शक्ती दलितांच्या जवळ येऊ लागली आहे याची प्रचिती दलित कवींच्या कवितेतून येते.

दलित कवींची संवेदनशीलता ही त्या कवींच्या आत्मानुभूतीच्या खोल व भरभक्कम पायावर उभी आहे. प्रतिभेच्या साहाय्याने निर्माण केलेल्या स्वप्नरंजित कल्पनारम्य अशा जगाशी तिचे नाते नसून ते बंडखोर सृजनाशी आहे. ज्याप्रमाणे अमेरिकेतील शोषित व गुलाम झालेल्या काळ्या माणसाला गोरा माणूस आपला शत्रू वाटतो त्याचप्रमाणे अस्पृश्य समाजातील कवीला स्पृश्य सवर्ण समाजाची संस्कृती व त्या संस्कृतीतून पोसलेली जीवनमूल्ये व जीवनधारणा निषिद्ध वाटतात.

मराठी साहित्य विश्वात दलित कवितेचा आविष्कार, तिचा आकार, तिचा आशय, घाट रुप व शब्दकळा ही आजवर प्रसिद्ध झालेल्या कवींच्या कवितेपेक्षा आमूलाग्र वेगळी नवी व स्वयंभू अशी आहे. दलित कविता म्हणून तिचे आत्मप्रकटन व आत्मरेखाटन दलित अस्मितेने भरलेले आहे. दलित जाणिवेतून व आत्मशोधाच्या अंगाने ही कविता विकसित होताना दिसते.

दलित कवितेचे स्वरुप पाहिले असता असे लक्षात येते की, माणूस शोधण्याचा कोणत्याही वाङ्मयातील ललित कृतीचे संवेदनशील अंत:करणाच्या भूमीत रुजते. ते तेथेच प्रथम अंकुरते. दलित साहित्याच्या संदर्भात राजकाट्यांची कुंपणे तोडली जाऊन आविष्कार स्वातंत्र्याची मोकळी झुळुक लागताच सर्वप्रथम उगवण काव्याच्या उद्यानात झाली.

दलित कविता ही क्रांतिसन्मुख कविता आहे. कारण हा कवी बराच दुखावलेला आहे. इतर कवींचे दुखणे आणि दलित कवींचे दुखणे यामध्ये फरक आहे. गावकुसाबाहेर राहणाऱ्या या दलित कवीचे माणूसपणच समाजाने नाकारले आहे. माणूस म्हणून जगण्याचा आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्याला झगडण्याशिवाय पर्यायच नाही. ही भूमिका घेऊनच दलित कवी काव्यलेखन करतो.

## १.५ दलित कवितेतील सामाजिक जाणीव :

व्यक्ती आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. व्यक्ती जेव्हा समाजजीवन जगत असते तेव्हा व्यक्तीव्यक्तींच्या परस्पर संबंधातून, प्रभावातून अनेक बरे-वाईट अनुभव येत असतात. हे अनुभव कधी सुखद तर कधी निराशाजनक असतात. कधी चीड आवेश आणणारे, तर कधी आव्हानात्मक ऊर्मी निर्माण करणारे असतात. आपल्या सभोवतालचा समाज आणि तेथील सामाजिक नीती-नियम, रुढी-परंपरा, प्रगती-परागती, सत्ता आणि स्पर्धा इत्यादी अनेक गोष्टीमुळे व्यक्तीला येणारे विविध अनुभव व त्यामुळे तिच्या मनात

निर्माण होणाऱ्या उर्मी जेव्हा साहित्यातून अभिव्यक्त होतात तेव्हा ते सामाजिक जाणीव प्रकट करणारे साहित्य आहे असे आपण म्हणतो.

सामाजिक जाणीव सर्वच संतांच्या मराठी कवितेतून कमी-अधिक प्रमाणात प्रकट होताना दिसते. तथापि, संतकाव्यातील सामाजिक समता फक्त अध्यात्मापुरतीच मर्यादित आहे. त्यांनी समाजातील रुढ व्यवस्था बदलण्याविषयी काहीही म्हटलेली नाही. संत कवितेनंतर शाहिरी कविता येते. "इ.स. १८८० ते १९३० या कालखंडातील शाहिरानी शाहिरी वाङ्मयाला पुन:प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. शाहीर पठ्ठे बापूराव इ. ......सवर्णाबरोबरच तात्या सावळजकर, शिवा संभापूरकर, अर्जुना वाघोलीकर, हरिभाऊ वडगावकर, भाऊ फक्कड या दलित शाहिरांचे योगदान महत्त्वाचे आहे."[१२] हे डॉ. कृष्णा किरवले यांचे मत योग्य वाटते. कारण त्यावेळी चळवळीच्या माध्यमातून समाज जागृत करण्याचे कार्य चालू होते.

संत कविता आणि शाहिरी कविता यानंतर एकदम १९६० नंतरची दलित कविताच सामाजिक जाणीव व्यक्त करतांना दिसते.

१९६० नंतरच्या दलित कवितेमध्ये जी सामाजिक जाणीव व्यक्त झाली आहे ती म्हणजे आंबेडकरांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव पडल्याने संवेदनशील मनाच्या शिक्षित तरूणांची आत्मानुभूती आहे. या शिक्षित तरूणांच्या पहिल्या पिढीतील महत्त्वाचे कवी नारायण सुर्वे यांनी आपल्या कवितांमध्ये जो आशावाद जपला आहे त्या पाठीमागे भोळाभाबडा विश्वास किंवा भविष्यावर नुसती पोकळ श्रद्धा नाही. एकतर कवीने स्वत:च्या आयुष्याचा येथे शोध घेतलेला आहे. कारण खोट बोलून आयुष्य कोणाला सजवता येते हे कवीला पूर्ण माहीत आहे. तरीही येथे कवी आपल्या जीवनातील अनुभवाशी बेइमान होत नाही. आयुष्यातील इमान विकत घेणारी दुकाने पाड्यावाड्यावर भेटली. पण बेईमान उजेडात स्वत:ची एक वात त्याला जपून न्यावयाची होती. कवी म्हणतो समोर येईल त्याला

लाचार, नमस्कार करून तडजोड केली नाही. अनेक प्रेषित भेटले, पण त्यांच्या समोरही विनाकारण हात जोडले नाहीत. स्वत:ला शोधण्यातच अर्धे अधिक आयुष्य निघून गेले. दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दु:खात गेले, आयुष्याचे सर्वस्व असणारे हात ते तर सदैव दारिद्र्याकडे गहाण राहिले. या दुनियेचा सारखा विचार करता-करता दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे हे याच शाळेत शिकलो.

''झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले दोन दु:खात गेले.''[१३]

('दोन दिवस', 'ऐसा गा मी ब्रह्म', पृष्ठ क्र.५३)

समाज जीवनातील विदारक अवस्थेचे चित्रण 'दोन दिवस' या कवितेत कवी करतो. जीवनापासून पळून तर कुठे जाता येत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून म्हणजे महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला सुरवात होते. त्या अगोदर डॉ. आंबेडकरांच्या जन्मापासून त्यांनी अस्पृश्यतेचे दु:ख भोगले होते. प्रसंगी त्यांच्या अनेक पिढ्या अस्पृश्यतेच्या काट्यातून जळून खाक गेल्या होत्या. असंख्य गोरगरीबांना अस्पृश्यतेचे भयंकर चटके बसत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च विद्याविभूषित असूनही त्यांना देशात कुठे मानाची, सन्मानाची वागणूक मिळाली नाही. निसर्गाने मोफत दिलेले पाणीसुद्धा त्यांना कुणी दिले नाही. कवी नारायण सुर्वे 'काम्हून' या कवितेत एका भंगी समाजाच्या मुलाला अस्पृश्यतेची वागणूक दिली जाते. तो त्या शाळेवर दगड मारुन काच फोडतो परंपरेने रुढीने मलूल बनलेली त्याची आई त्याला म्हणते.

''व्हय रं
तू शाळावर दगडी मारल्यास !
शाळांच्या काचा फोडल्यास ?''
''ते मला मैल्या म्हणतात म्हणून.''[१४]

('सनद', पृष्ठ क्र.१५)

त्या मुलाची ओळख समाजात मैला उचलणारीचा मुलगा अशीच आहे. या गोष्टीचा राग मुलाला आला. माणसाचे मोठेपण त्याच्या कामावरून ठरवावं का ? मी वर्गात स्वच्छ येतो अभ्यासात हुशार आहे. मग मला ही मुलं असा का त्रास देतात? असा स्वाभिमानी विचार तो मांडतो. डॉ. आंबेडकरांच्या विचारामुळे त्यांच्या शिकवणुकीमुळे त्याच्या ठिकाणी स्वाभिमान कसा निर्माण झाला याचे प्रत्यंतर येते.

तसेच नामदेव ढसाळ यांचा 'गोलपिठा' हा काव्यसंग्रह मराठी कवितेतला मैलाचा दगड समजला जातो. त्यांच्या कवितेने कवितेला एक नवा चेहरा आणि आवाज दिला. त्यांची कविता वासना आणि विद्रोहाच्या रसायनाने तप्त झालेली आवेशपूर्ण विधानांची मुक्तछंदातील आहे. आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाचा बदला घेण्याची चिथावणी ते वाचकाला देतात. ही उग्र सामाजिक जाणीव जगण्यातील असह्य दाह दाखविते.

दलितांचे दु:ख आज पिढ्यान्‌पिढ्या हजारो वर्षे तसेच चालू आहे. कायद्याने अस्पृश्यता गेलेली असली तरी आजही सामाजिक मन सुधारलेले नाही, ह्याची जाणीव स्पष्टपणे कवितेतून व्यक्त होताना दिसते. त्याचे वेगवेगळे आविष्कार कवितेत प्रकट झालेले आहेत. खेड्यापाड्यातील दलितांच्या वाट्याला आजही नरकप्राय जीवन आलेले दिसते. हीच वेदना दलित कवितेत प्रभावीपणे व्यक्त होते. ही वेदना म्हणजे हजारो वर्षे चालू असलेले सांस्कृतिक दुखणे आहे. हे दुखणे एका व्यक्तीचे नसून, एका विराट बहि:ष्कृत मानवी समाजाचे आहे. त्यामुळे दलित कवितेतील वेदना ही सामूहिक वेदना आहे.

> ''अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
> नरकाच्या कोंडवाड्यात, किती दिवस राहायच आम्ही.''[१५]
>
> ('अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा', गोलपिठा, पृष्ठ क्र.६)

विषम समाजरचनेमुळे दलितांना अमानुष दु:खे सहन करावी लागतात. ही दु:खेच वेदनेच्या रुपाने दलित कवितेत बोलकी झाली व या वेदनेतूनच दलित कविता जन्माला

आली. आजपर्यंत ज्या अनंत यातना भोगल्या, सोसल्या त्याचा खरा अर्थ त्यांना कळू लागला. परिणामत: दलित कवी आपल्यावरील अन्यायाचे, शोषणाचे आणि वेदनांचे आविष्करण करू लागले. ढसाळांचे अनुकरण करीत अनेकांनी कविता लिहिल्या आहेत.

दलित समाजात जन्माला आलो म्हणून तोंडात कचकचीत शिवी येणे हा काही गुन्हा नाही असे म्हणणारे दया पवार आविष्काराच्या पातळीवर मात्र आपल्या कवितेत वैयक्तिक व्यथांना घेऊन येतात. ते म्हणतात, दु:ख भोगतानाही आम्ही तक्रार केली नाही. परंतु हा कोंडवाडा कोणी निर्माण केला ? कवी म्हणतो,

''शिळेखाली हात होता
तरी नाही फोडला हंबरडा
किती जन्माची कैद
कुणी निर्मिला हा कोंडवाडा.''[१६]

('हे महान देशा', 'कोंडवाडा', पृष्ठ क्र. २०)

आपण कोंडवाड्यात जगतो आपल्याला कैद्यासारखी वागणूक मिळते, ही त्यापाठीमागील जाणीव भयानक स्वरुपाची आहे. दया पवारांची कविता जरी वैयक्तिक दु:खाचा आविष्कार करणारी असली तरीही त्यातील 'मी' हा मी राहत नाही तर 'आम्ही' बनतो. स्वत:बरोबर सर्व समाजाच्या वेदनांना कवी शब्दबद्ध करतो. 'गांधी जन्मशताब्दी' या कवितेत अस्पृश्यतेचे दु:ख महात्मा गांधीजींच्या तैलचित्राचे अनावरण कांबळे नावाच्या अस्पृश्य कामगाराच्या हस्ते होते. आणि तो कार्यक्रम झाल्यावर कांबळे नावाचा एक गृहस्थ प्रसाद वाटू लागल्यावर कुणीतरी म्हणते,

''ये भडविच्याने अरे प्रसाद बाटवला.''[१७]

('कोंडवाडा', पृष्ठ क्र.२१)

समाजातील पुढाऱ्यांचे हे किती दुटप्पी वर्तन ! किती दिखाऊपणा ! याचीच कवीला चीड येते. वीजेचा शॉक बसावा तसे अनेक हात आखडले जातात. दया पवार मोठ्या मार्मिकपणे लिहितात ज्या गांधीजींनी हरिजनांसाठी आपले आयुष्य वेचले. त्यांनी हरिजनांना देवाची लेकरे म्हणविले. त्यांच्याच तैलचित्राच्या अनावरणाच्या वेळेला असा प्रसंग उद्‌भवावा हे केवढे दुर्भाग्य म्हणावे ? अशा प्रवृत्तीतून सामाजिक समता कशी निर्माण होणार ? असा प्रश्न कवी या कवितेतून विचारतो. दया पवार हे दलित चळवळीतून पुढे आलेले कवी आहेत. म्हणूनच समाजात दिसणाऱ्या ढोंगी व स्वार्थी प्रवृत्तीची त्यांना चीड आहे. हीच चीड व संताप सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनासाठी चाललेल्या संघर्षाचे चिन्ह आहे.

दलितांच्या या भयानक अवस्थेचे कारण असलेली समाज व्यवस्था बदलली पाहिजे असे अर्जुन डांगळे यांना अंत:करणापासून वाटते. ते म्हणतात–

''आता तुझ्या मुर्दाड मनातून ठिणग्या फुलू देत
आता तुझ्या रुढ्या, सुख्या ओठांतून ज्वाला निघू देत
आता तुझ्या रुतलेल्या, पावलांना चाके फुटू देत
आता तुझ्या हातातील बेड्या कडाकडा तुटू देत.''[१८]

('तोडला गेलेला तू', 'छावणी हलत आहे', पृष्ठ क्र.३३)

कवीने स्पष्ट शब्दात हे आव्हान आपल्या जातबांधवाना केले आहे. यावरून असे म्हणता येईल की, दलित कवितेने केवळ काव्य निर्मितीच्या क्षेत्रातच आघाडी निर्माण केलेली आहे असे नव्हे तर समाजात आणि साहित्यात नवनवीन प्रश्न निर्माण केलेले आहेत. दया पवारांच्या मते ''ह्या सर्व लिखाणात जळजळीत अशी धग आहे. मराठी साहित्यात आव्हानात्मक असा विद्रोह कल्लोळ दलित साहित्याने आणला. प्रेम, तारका, पाने, फुले, समुद्र, कातरवेळ हे विषय सनातन आहेत. ह्यात दुमत होणे शक्य नाही. पण तेच विषय

केवळ भावजीवस्पर्शी आहेत. तेथूनच भावनांचा झरा खळखळतो ह्यावर आमचा विश्वास नाही.''[१९]

एकूणच दलित कविता ही समाजपरिवर्तनाची व प्रबोधनाची सशक्त सुंदर अभिव्यक्ती आहे. ती आजच्या दलित कवींची क्रांतीगामी सृजनशील मनाची मोकळी व उत्कट अभिव्यक्ती आहे.

मनुस्मृतीच्या दहनाने भारतातील तथाकथित पंडित, धर्मगुरू, आचार्य, शंकराचार्य यांना हादरा बसला. या मुक्त कार्याने तत्कालीन हिंदू समाज ढवळून निघाला आणि दलित मनाला उभारी मिळाली. डॉ. आंबेडकरांनी या धर्मग्रंथाच्या रूपाने दलिता वरील अन्यायरूपी मनुचे दहन करून दलितांच्यामध्ये सामाजिक जागृती घडविली. त्यांच्यामध्ये अन्याय अत्याचाराबद्दलची चीड निर्माण करून प्रतिकाराची शक्ती व एक विचारांची बैठक प्राप्त करून दिली. याच घटनेवर पुढे अनेक कवींनी काव्यलेखन केले. नाटकातून या विषयावर लिखाण झालेले आढळते. मनुस्मृतीमुळे दलितांच्या काय हाल, अपेष्टा चालल्या होत्या, त्यांच्या जीवनाची कशी होरपळ चालू होती. यावर अनेक कवीनी काव्यलेखन करून हा विषय हाताळलेला आहे. समाजाच्या मृतवत दारूण अवस्थेबद्दल कवी अंतर्मुख होऊन विचार करू लागतो. इथली वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, कवी मनाला जाळत पुढी उभी राहते. दलितांना सर्व दृष्टीने हीन दीन लाचार करणारी ही मनुव्यवस्था कवींच्या डोळयासमोर उभी राहते आणि वामन निंबाळकर म्हणतात –

> ''जगत असताना मेलो कितीदा
> माझा जगताना अन् मेल्यावरचा शेवट सारखाच याचे कारण
> या मनुच्या देशात म्हणतात,
> 'अस्पृश्यता मी जन्मातच सोबत आणली'
> अन् मेलो तेव्हा सोडून ही गेली का प्रेतावर ?

कारण माझा मृत्यू आकाश गाठतानाच''[२०]

('माझा मृत्यु', 'गावकुसाबाहेरील कविता' पृष्ठ क्र.१०)

वरील कवितेतून ही समाजातील असणारी वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, कशाप्रकारे आहे याचे भीषण चित्रण येते.

तसेच यशवंत मनोहर आपल्या ''उत्थानगुंफा''या कविता संग्रहातील 'मी पाहतो' कवितेत म्हणतात –

''मी पाहतो उन्हाचे ससंदर्भ कळप
हिरवे कुरण चरणासारखे
मी पाहतो माझे लुप्त भरलेले भवताल
आचके देत मरणारे
अनादि अनंतापासून शहाजोग''[२१]

('मी पाहतो', 'उत्थानगुंफा', पृष्ठ क्र.११)

पुढे ते म्हणतात, पिढ्या पिढ्यांच्या सर्व बेरजा आता बंद करा. थोडे भागाकार होतील. सर्व बेरजा होणार नाहीत. असा इशारा देऊन थोडेसे आक्रमक होऊन आपल्यावरील अन्यायी शोषिक वृत्तींचा ते धिक्कार करतात. सवर्णांना इशारा देतात. त्यांच्या कवितेत कुठेही आगतिकता दिसत नाही. तर प्रचंड राग, त्वेष, मत्सर व पेटवण्याची उग्र भाषा दिसते. समाजात मूलगामी बदल व्हावा, मानवी प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त व्हावी म्हणूनच त्यांची कविता विद्रोही बनते.

कवी यशवंत मनोहरांनी आपल्या मनातल्या जहाल जाणिवा कित्येक काव्यातूनच व्यक्त केल्या आहेत. उदा.

''ज्यांनी इथल्या सूर्याला, दगडानांही
ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले
संचित निश्चित केले

त्या हरामखोर परंपरावर मी विध्वंसाचा
नांगर धरतो.''[२२]

('वैरी', 'उत्थानगुंफा', पृष्ठ क्र.१५)

समाजातल्या घातक परंपरा अन्यायकारक रुढीमुळेच आमच्यावर अन्याय झाला. आमचा माणूस म्हणून जगण्याचा हक्कच हिरावला गेला असे कविला वाटते. म्हणूनच अत्यंत आवेशाने तो विध्वंस करण्यास पुढे सरसावतो. शब्दांच्या झंझावातातून कवी मनातला आक्रोश आणि प्रखर नकार व्यक्त करतो. कवीची भावना अतिशय प्रामाणिक असून दंभावर कोरडे ओढताना शिवराळ होते.

याचबरोबर दलित कवयित्रिची कविता ही भावनोत्कटतेपेक्षा चिंतनशीलतेशी उत्कट नाते सांगून जाते. स्वत:बरोबर वाचकालाही अंतर्मुख व्हायला लावून नव्या विचाराकडे झेपावण्यास सिद्ध करणारी ही कविता आहे.

'दिशा' हा ज्योती लांजेवार यांचा काव्यसंग्रह होय. दलित समाजात बदल घडवून आणण्याची ताकद असलेली, दलितांच्या वेदना शब्दात समर्थपणे व्यक्त करणारी त्यांची कविता आहे. या कवितेत समाजामध्ये वावरत असताना जे जे अनुभव आले ते ते काव्यरुपाने आविष्कृत झाले आहेत. सामाजिकता हा या कवितेचा प्राण आहे.

भारतीय समाजव्यवस्थेचे मानसशास्त्र अचूकपणे ओळखल्यामुळे येथील सांस्कृतिकदृष्ट्या जीर्ण आणि कुचकामी ठरलेल्या आदर्शमूल्यांबाबत ही कवयित्री केवळ उदासीनच नाही तर अशा समाजरचनेपासून तिला फारशी अशा वाटत नाही म्हणूनच नव्या संस्कृतीचा सूर्य तळपत ठेवण्यासाठी तिने मनोनिश्चय करून टाकला आहे.

''या दुष्टांच्या हातून मावळणारा सूर्य
तू तळपत ठेव अंधारू नकोस आभाळ
हे कृष्णा,.... तुझ्याराज्यात

आईबहिणीवर अत्याचार
अन्...... तू डोळे मिटावेस असे पार..."[२३]

वरील कवितांच्या ओळीतून कवयित्री ज्योती लांजेवार स्वाभाविक कठोर बनली आहे. तसेच 'कुरूक्षेत्र' ही कविता भूतकालीन अनुभवातून जशी जोपासलेली आहे तशीच ती वर्तमानकालीन वास्तवतेतून भविष्यकाळाची सुखद स्वप्ने रंगविणारी आहे.

"माझ्या डोळ्यापुढे सतत उभी असते
कौरवाच्या राज्यभोत बेअब्रु होणारी पांचाली"[२४]

स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या दु:खाची परिणामकारक अभिव्यक्ती या कवयित्रीने केली आहे. थेट महाभारतकालीन समाजरचेनमध्ये स्त्रीला अवहेलना, वंचना आणि अप्रतिष्ठा कां भोगावी लागते ? ह्याचे सुक्ष्म निरीक्षण या कवयित्रीने केले आहे.

मीना गजभिये हे ज्योती लांजेवार यांच्याप्रमाणेच लक्षात येणारे दुसरे नाव. ही कवयित्री निसर्गाच्या माध्यमातून आपल्या शब्दांना आकार देण्याचा प्रयत्न करीत असून प्रकृतीपिंडाने विद्रोही असण्यापेक्षा प्रवर्तक असण्यावर या कवयित्रीने अधिक भर दिलेला आहे. त्यांच्या कविता 'अस्मितादर्श' (एप्रिल, मे, जून, १९७९) मध्ये प्रकाशित झाल्या असून त्यामध्ये 'येरे येरे पावसा' आणि 'प्रकाश विरघळला अंधारात' या दोन कविता या ठिकाणी विचारात घेतलेल्या आहेत. मीना गजभीयेची 'येरे येरे पावसा' ही कविता आत्मप्रत्ययाची जाणीव करून देणारी आहे.

"आज सकाळी मला हिवाळा भेटला
फुटपाथवर थंडीत कुडकुडतांना
एकमेकावर दात आपटत मी
कसे तरी त्याचे स्वागत केले"[२५]

हिवाळ्याचे असे कसेबसे स्वागतच ती करते. सर्वच ऋतुंच्या सौंदर्याचे कौतुक सवर्णांच्या कवितेतून आढळते. अत्यंत उत्साहाने आनंदाने ते स्वागत करतात. कवयित्री

मात्र गरीब दलित व्यक्तीची स्थिती कशी असते हे दाखविते. असा आत्मप्रत्ययाचा संदर्भ असलेली ही कविता आहे. त्यामुळे त्यामध्ये निसर्गाविषयी आत्मीयता आढळत नाही. सूक्ष्म नकाराची वृत्तीच दिसते.

"आपण माणूस आहोत आणि माणसाचे सारे हक्क आपल्याला मिळायला हवेत या जाणिवेतून विद्रोह जन्माला आला."[२६] असे दलित कवितेतील विद्रोहाचे जन्म कारण भालचंद्र फडके सांगतात.

अशाप्रकारे दलित साहित्य हा एक १९६० नंतर मराठी वाङ्मय प्रवाहात आलेला एक स्वतंत्र वेगळा श्रेष्ठ वाङ्मय प्रकार आहे. या साहित्याची निर्मिती प्रामुख्याने बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून, चळवळीच्या प्रेरणेतून झालेली आहे. दलित साहित्यात कविता विपुल प्रमाणात निर्माण झालेली दिसते. या कवींनी आपल्याला सोसाव्या लागणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या वेदना वास्तव रुपात शब्दबद्ध केल्या आहेत. समाजाकडून जी निकृष्ट दर्जाची वागणूक आपल्याला मिळते. त्याबद्दलचा संताप ही अत्यंत परखड शब्दात कवी व्यक्त करताना दिसतात. कवितेतील या चीड आणि वेदना या पाठामागे आपल्या समाज बांधवांना प्रेरणा देण्याचे, चळवळ उभारण्याचे बळ देण्याचे आणि त्यांचे योग्यप्रकारे प्रबोधन करण्याचे सूत्र देखील आहे. अशी ही दलित कविता रोखठोक शब्दात सामाजिक जाणीव प्रकट करणारी सामाजिक विषमता चव्हाट्यावर मांडणारी आहे.

## १.६ निष्कर्ष :

१) दलित कविता हा स्वातंत्र्योत्तर काळातील प्रभावी असा वाङ्मय प्रवाह आहे.

२) दलित साहित्याच्या संकल्पनेविषयी लिहिणाऱ्या मान्यवर साहित्यिकांनी केलेल्या व्याख्येमधून असे जाणवते की, माणसाच्या प्रतिष्ठेचे व माणुसकीचे मूल्य प्रस्थापित करण्यासाठी लढ्याची प्रेरणा देणारे हे साहित्य आहे.

३) दलितांची चळवळ आणि दलित साहित्य यांचा परस्पर संबंध आहे.

४) प्रारंभीच्या दलित साहित्यात प्रामुख्याने वेदना, विद्रोह, यातना या भावनांचे चित्रण असून त्या सर्वांच्या मागे प्रबोधनाचे सूत्र आहे. आंबेडकरांच्या विचारांचे अधिष्ठान आहे.

५) दलितांची अस्मिता जागविणारा, त्यांची स्वप्ने पल्लवित करणारा प्रगतीशील विचार, भावना, संवेदनाचा उदात्त हुंकार म्हणजे दलित कविता होय.

६) दलित कवितेच्या पूर्वकालातील संतकाव्यातील सामाजिक समता फक्त अध्यात्मापुरतीच मर्यादित आहे. त्यांनी समाजातील रुढ वर्णव्यवस्था बदलण्याविषयी काहीही म्हटलेले नाही. दलित साहित्याने मात्र त्याचा आग्रह धरला आहे.

७) दलित कवितेची प्रेरणा प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हीच आहेत.

८) दलित कवितेचे स्वरुप पाहिले असता असे लक्षात येते की, माणूस शोधण्याचा कोणत्याही वाङ्मयातील ललित कृतीचे साहित्यबीज हे सर्वप्रथम स्वतंत्र सृजनशील आणि संवेदनशील अंतःकरणाच्या भूमीत रुजते. ते तेथेच प्रथम अंकुरते. दलित साहित्याच्या संदर्भात रानकाट्यांची कुंपणे तोडली जाऊन आविष्कार स्वातंत्र्याची मोकळी झुळुक लागताच सर्वप्रथम उगवण काव्याच्या उद्यानात झाली.

९) दलित कविता प्रामुख्याने समाजातील एका विशिष्ट गटावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे अत्यंत भयावह वास्तवचित्र रेखाटणारी आहे.

१०) दलित कवितेचा जन्म अस्पृश्यतेच्या आगीत सोसाव्या लागणाऱ्या यातनात आहे. ज्याला जसे आयुष्य भोगावे लागले तसा त्याच्या कवितेचा रंग आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील विषमता नष्ट करणे हा या कवींचा मुख्य उद्देश आहे.

११) दलित कवींच्या कवितेत समाज हाच नायक आहे. दलित कवयित्रीनी देखील मोलाची भर घातली आहे.

१२) दलित कवितेत बंडखोरी आहे. ती माणुसकीसाठी आणि सामाजिक समानतेच्या स्थापनेसाठी आहे.

१३) दलित कवितेत विद्रोह तीव्र स्वरुपाचा असून समाज बांधवांना लढ्याची प्रेरणा कवी देताना दिसतात.

१४) दलित कवितेतील विद्रोह हा आपणही माणूस आहोत आणि माणसाचे सर्व हक्क आम्हालाही मिळायलाच हवेत. या कवींच्या भूमिकेतून आलेला आहे हे भालचंद्र फडक्यांचे विधान सत्य आहे.

१५) दलित कविता सामाजिक जाणीवेने ओतप्रोत भरलेली आहे. सामाजिक विषमता चव्हाट्यावर मांडणारी आहे.

-----

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | वानखडे म.ना. | : | प्रस्तावना 'सूड', बाबुराव बागूल, अभिनव प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९७०, पृष्ठ क्र.८. |
| २) | बागूल बाबुराव | : | 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', मार्च, एप्रिल, १९७१, पृष्ठ क्र.३४. |
| ३) | सरदेशमुख त्र्यं.वि. | : | 'अस्मितादर्श', दिवाळी अंक, १९७७, पृष्ठ क्र.६. |
| ४) | मेश्राम केशव | : | 'दलित लेखकांचे पहिले संम्मेलन', मुंबई, १९५८. |
| ५) | मुक्तिबोध शरदचंद्र | : | 'साहित्य सिंहगर्जना', जानेवारी, १९७६. |
| ६) | नेरुरकर प्र.श्री. | : | 'माय मराठी', ऑक्टोबर, १९७५, पृष्ठ क्र.२८. |
| ७) | चिटणीस म.भि. | : | 'अस्मितादर्श', मेळावा, औरंगाबाद येथील भाषणातून उद्‌घृत. |
| ८) | ग्रामोपाध्ये गं.बा. | : | 'सत्यकथा', जुलै, १९७३, पृष्ठ क्र.७२. |
| ९) | पानतावणे गंगाधर | : | 'मागोवा', १९७३, पृष्ठ क्र.८०. |
| १०) | ढाले राजा | : | प्रस्तावना 'नाकेबंदी', जयमाला प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७६. |
| ११) | भीमराव रा. | : | 'बहि:ष्कृत भारत' दि. ३.४.१९२७, पृष्ठ क्र.२७. |
| १२) | किरवले कृष्णा | : | 'आंबेडकरी शाहिरी एक शोध', नालंदा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९२, पृष्ठ क्र.४४. |
| १३) | सुर्वे नारायण | : | 'दोन दिवस', 'ऐसा गा मी ब्रह्म', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९७१, पृष्ठ क्र.५३. |
| १४) | तत्रैव | : | 'सनद', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८८, पृष्ठ क्र.१५. |
| १५) | ढसाळ नामदेव | : | 'अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा', 'गोलपिठा', निलकंठ प्रकाशन, पुणे, ३०, द्वितीय आवृत्ती, १९७५, पृष्ठ क्र.६. |

१६) पवार दया : 'हे महान देशा', 'कोंडवाडा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीय आवृत्ती, १९९४, पृष्ठ क्र.२०.

१७) तत्रैव : पृष्ठ क्र.२१.

१८) डांगळे अर्जुन : 'तोडला गेलेला तू', 'छावणी हलते आहे', कर्मवीर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७७, पृष्ठ क्र.३३.

१९) पवार दया : 'उपेक्षितांच्या नव्या जाणिवा', प्रतिष्ठान, जुलै, १९६९, पृष्ठ क्र. १०.

२०) निंबाळकर वामन : 'माझा मृत्यु', 'गावकुसाबाहेरील कविता', अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, १९८२, पृष्ठ क्र.१०.

२१) मनोहर यशवंत : 'मी पाहतो', 'उत्थानगुंफा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, ३०, प्रथम आवृत्ती, १९७७, पृष्ठ क्र. ११.

२२) तत्रैव : 'वैरी', पृष्ठ क्र. १५.

२३) खंडेराव हरीश : 'आंबेडकरी कवितेचे अंतरंग', जागर प्रकाशन, मुंबई,प्रथम आवृत्ती, १९८१, पृष्ठ क्र. १११.

२४) तत्रैव : पृष्ठ क्र. १११.

२५) तत्रैव : पृष्ठ क्र. ११४.

२६) फडके भालचंद्र : 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', श्री विद्या प्रकाशन, पुणे, ३०, प्रथम आवृत्ती, १९७८, पृष्ठ क्र. ६७.


-----